—: प्रेसनोट :— दि. २५/०९/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३९/२०२१ |
| कलम | ७, भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | नागेश अंबादास पुराणिक, वय ४५ वर्ष, व्यवसाय—नोकरी, सहायक पोलीस निरीक्षक, मालमत्ता कक्ष, गुप्रशा. गुअवि, भायखळा, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ८,००,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. २,००,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांचे पती व पतीच्या मित्रावर मालमत्ता कक्ष, गुप्रशा, गुअवि, भायखळा, मुंबई यांचेकडील बि.एम.डब्लू, कार चोरीच्या गुन्हयामध्ये कारवाई न करण्यासाठी यातील लोकसेवक यांनी प्रथम यातील फिर्यादीकडे रु. १२,००,०००/— लाचेची मागणी करुन त्यापैकी रु.४,००,०००/— स्विकारले. त्यानंतर उर्वरीत रु.८,००,०००/— साठी यातील लोकसेवक यांनी फिर्यादीकडे तगादा लावला. परंतु यातील फिर्यादीस उर्वरीत रु.८,००,०००/— लाच यातील लोकसेवकास देण्याची इच्छा नसल्याने फिर्यादीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे दि. २४/०९/२०२१ रोजी प्रत्यक्ष येवुन लेखी तक्रार दिली.<br><br>दि.२४/०९/२०२१ रोजी फिर्यादी यांच्या लेखी तक्रारीवरुन पंचासमक्ष लोकसेवक यांच्या कार्यालयात पडताळणी केली असता, नमुद पडताळणी मध्ये यातील आरोपी लोकसेवक यांनी फिर्यादी यांना त्यांचे पती व मित्र यांचेवर कारवाई न करण्याकरीता उर्वरीत रु.८,००,०००/— रक्कमेची मागणी करुन तडजोडअंती रु.४,००,०००/— लाचेची मागणी केली व सदरची रक्कम ही दि.२४/०९/२०२१ रोजीच देण्यास सांगितले.<br><br>त्यावरुन दि.२४/०९/२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक यांनी रु.२,००,०००/— लाचेची रक्कम फिर्यादीकडुन स्विकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले.<br><br>फिर्यादी यांनी आलोसे यांचे विरुध्द दिलेल्या तकारीवरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

INSPECTOR OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI-CORRUPTION BUREAU

( अमोल शिंदे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in
ईमेल— १) acbwebmail@mahapolice.gov.in
२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४
दुरध्वनीक्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००